| | |
|---|---|
| MHSN060016502023 | PWDVA Appln./50/2023<br>Sou.Rohini Pradip Kamble, etc.1 Vs. Pradip Torna Kamble,etc.2 |

## निशाणी २० वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांनी म्हणणे देणेस विलंब केल्याने विलंब माफ होऊन म्हणणे अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** त्यांचे कथनानुसार, जाबदार हे दिनांक २५.०९.२०२३ रोजी कोर्टात हजर झालेले आहेत. तदनंतर प्रस्तुत कामामध्ये त्यांचेमार्फत कैफियत, म्हणणे दाखल करण्याकरीता मुदत घेण्यात आली. सदरकामी जाबदाद यांच्या आईच्या उपचारांकरीता त्यांना वेळ दयावा लागला. तसेच जाबदार यांना कागदोपत्री माहिती गोळा करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणुनबुजुन केलेला नसून वर नमूद केले कारणामुळे सदरचा विलंब झालेला आहे. सबब जाबदारने विलंब माफ होऊन म्हणणे अभिलेखावर घ्यावे, अशी विनंती केली आहे.

**०३.** अर्जदारतर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जातील सर्व मजकूर खोटा असलेने तो अर्जदार हिस मान्य व कबूल नाही. जाबदार यांनी त्यांचे अर्जात विलंबाचे कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. जाबदार हे केवळ काम लांबणीवर पाडणेकरीता जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहेत. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी यांचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम १२, १८, १९, २२ प्रमाणे दाखल केलेला आहे. जाबदार यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्राथमिक स्तरावर तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस अर्जदारचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरचा अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल.

**०६.** अर्जाचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते, अर्जाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी प्रस्तुत जाबदारास झालेला विलंब माफ करुन म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे उचित होईल. मात्र जाबदार यांनी म्हणणे अभिलेखावर दाखल करण्यास केलेला विलंब दुर्लक्षित करता येणार नाही. त्याकरीता त्यांचेवर दंड लावणे अभिप्रेत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | जाबदार यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे अभिलेखावर घेणेस दंडाची रक्कम रुपये २००/– अर्जदारास देण्याचे अटीवर परवानगी देण्यात येते. |
| ३. | उभयंतांनी नोंद घ्यावी. |

RANJANA VIJAY KAMBLE

Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2024.06.12 17:35:58 +0530

ठिकाण –मिरज.
दिनांक – ११.०६.२०२४.

(श्रीमती आर. व्ही. कांबळे)
२ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 11 | 06 | 2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 11 | 06 | 2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 11 | 06 | 2024 |